# १३. तिफन

**विठ्ठल वाघ** (१९४५) : सुप्रसिद्ध कवी व लेखक. 'काळ्या मातीत मातीत', 'पंढरीच्या वाटेवर', 'कपाशीची चंद्रफुले', 'पाऊसपाणी' हे कवितासंग्रह; 'अंधारयात्रा' हे नाटक; 'डेबू' ही कादंबरी; 'वऱ्हाड बोली आणि इतिहास', 'वऱ्हाडी म्हणी' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

पेरणी, बैलांविषयीचे प्रेम, पावसाच्या दिवसांतील मातीचा सुगंध, शेतकऱ्यांचे स्वप्न, पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांची होणारी शेतीकामांची लगबग, याचे वर्णन कवीने प्रस्तुत कवितेतून केले आहे.

काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते
नंदी बैलाच्या जोळीले सदाशीव हकालते
वटी बांधून पोटाले पाराबती उनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते
त्यात तानुलं लळते ढग बरसते
काकरात बिजवाई जसं हासरं चांदनं
धरतीच्या आंगोपांगी लाळानैसाचं गोंदनं
सरीवरी सरी येती माती न्हातीधुती होते
तिचा कस्तुरीचा वास भूल जीवाले पाळते
भूल जीवाले पाळते वाट सांजीले पाहेते
मैना वाटुली पाहेते राघू तिफन हानते
राघू तिफन हानते ढग बरसते
वला टाकती तिफन शितू वखर पाहेते
पानी भिजलं ढेकूल लोनी पायाले वाटते
काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते
डोया सपन पाहेते काटा पायात रुतते
काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते
हिर्व सपन फुलते ढग बरसते



## स्वाध्याय

**प्र. १. खालील अर्थाच्या शब्दसमूहाला कवितेतील योग्य शब्द दया.**

(१) पेरणीसाठी लागणारे बियाणे ________

(२) शेतकरी पेरणीसाठी वापरतो ते अवजार ________

(३) पाराबती करते त्या दोन कृती ________ ________

**प्र. २. खालील ओळींतील अधोरेखित संकल्पना स्पष्ट करा.**

(१) काकरात बिजवाई जस हासरं चांदनं (२) काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते

**प्र. ३. या कवितेत आलेले वऱ्हाडी बोलीतील शब्द शोधा व त्यांना प्रमाणभाषेतील शब्द लिहा.**

| वऱ्हाडी शब्द | प्रमाणभाषेतील शब्द |
|---|---|
| | |

**प्र. ४. कवितेच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचा विषय | कवितेतील पात्र | कवितेतील तुम्हांला सर्वांत आवडलेले प्रतिक | कवितेतील नैसर्गिक घटना |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(१) 'काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते', या ओळीचा संदर्भ स्पष्ट करा.

GTYDJR

## भाषाभ्यास

**✲ खालील वाक्ये वाचा.**

(१) मी शाळा जातो. (२) मी शाळेत जातो.

ही दोन वाक्ये तुम्ही वाचलीत. यांपैकी पहिले वाक्य चुकीचे आहे आणि दुसरे वाक्य बरोबर आहे. या दोन्ही वाक्यांमध्ये काय फरक आहे? पहिल्या वाक्यात 'शाळा' हा शब्द आहे. दुसऱ्या वाक्यात 'शाळा' या शब्दाला '-त' हा प्रत्यय लागला आहे.

**✲ खालील वाक्ये वाचा.**

(१) राम मित्राशी बोलतो. (२) रेश्मा पालीला घाबरते. (३) कल्पना दुकानात जाते.

या वाक्यांमध्ये, मित्र, पाल, दुकान या नामांना अनुक्रमे -शी, -ला, -त हे प्रत्यय जोडलेले आहेत. प्रत्यय लागण्यापूर्वी या शब्दांमध्ये काही बदल झाले आहेत. उदा., मित्र~मित्रा-, पाल~पाली-, दुकान~दुकाना-. शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या या बदलाला शब्दाचे **सामान्यरूप** म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** म्हणतात. उदा., 'दुकान' हे सरळरूप आणि दुकाना- हे सामान्यरूप.

नामांना किंवा सर्वनामांना लागणारे प्रत्यय अनेक प्रकारचे असतात. -ला,-त,-ने,-शी,-चा,-ची,-चे इत्यादी. नामांना व सर्वनामांना प्रत्ययांबरोबरच शब्दयोगी अव्यये जोडली जातात. तेव्हासुद्धा सामान्यरूप होते.